# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली

दिनांक ०२/०१/२०१९

## सन २०१८ गडचिरोली पोलीसांकरीता ठरले सर्वात यशस्वी वर्ष

सन २०१८ हे वर्ष गडचिरोली पोलीस दलाकरीता अत्यंत यशस्वी ठरलेले असुन या वर्षात पोलीस दलाने अत्यंत प्रभावीपणे नक्षलविरोधी अभियान राबवुन तब्बल ५० नक्षलवादयांना कंठस्नान घालण्यात यश संपादन केलेले आहे. त्या सोबतच २९ जहाल नक्षलवादयांना अटक करण्यात आलेली असुन १८ नक्षलवादयांनी पोलीसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या हया उत्कृष्ठ कामगीरीमुळे सन २०१८ मध्ये जिल्हयातुन जवळ-जवळ ९७ नक्षलवादयांचा नायनाट केला आहे. त्याच बरोबर नक्षलवादयांकडील हत्यारे, दारुगोळा जप्त करण्यात देखील पोलीस दलाला मोठया प्रमाणात यश मिळाले. महत्वाची बाब म्हणजे गडचिरोली पोलीस दलाची कसल्याही प्रकारची हानी अभियानादरम्यान झालेली नसुन अतिशय कौशल्यपुर्ण अभियान राबवुन गडचिरोली पोलीस दलाने वरील उत्तुंग कामगिरी नोंदविली आहे.

यात गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचे जवानांनी अतिशय खडतर अभियान राबवुन पोलीस दलाची मान फक्त राज्यातच नव्हे तर देशात उंचावली आहे.

एकीकडे प्रभावीपणे नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दुसरीकडे मोठया प्रमाणावर स्थानिक नागरिकांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करुन नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती करुन त्याचा लाभ करुन देण्यासाठी तसेच त्यांच्या मुलभुत समस्या जाणुन घेवून निराकरण करण्याकरीता विविध कार्यक्रम देखील पोलीस दलाने घेतलेले आहे. यामध्ये तब्बल २५२ जनजागरण मेळावे व ९६ जनसंपर्क कार्यक्रम, २००२ ग्रामभेटी घेण्यात आले. त्यामुळे प्रशासनाशी नागरीकांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होवुन स्थानिक जनतेचा विश्वास संपादन करुन जनतेची प्रशासनावरील विश्वासाची व आपुलकीची भावना वाढण्यास मदत मिळालेली आहे.

त्यासोबतच पोलीस दलाने आदीवासी मुलां-मुलींच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील इतर ठिकाणी झालेली शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व औदयोगिक प्रगतीची माहिती होवुन त्याच्या

मनातील नक्षलवादयांचा प्रभाव कमी करण्यासाठी  महाराष्ट्र सुवर्ण जयंती सहल योजना राबवुन १६३ मुले व १५३ मुली यामध्ये १२ नक्षल पिडीत पाल्य व ७ नक्षलवादयांचे नातेवाईक असे एकुण ३१६ विदयार्थ्यांना महाराष्ट्र दर्शन सहलीचा लाभ देण्यात आला. गडचिरोली जिल्हयातील सुशिक्षीत तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देवुन जिल्हयातील आदीवासी बांधवाना मुख्य प्रवाहात समाविष्ठ करण्याच्या उद्देशाने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करुन त्यातुन ८२४ सुशिक्षीत तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. त्याच प्रमाणे जिल्हयातील युवक -युवतींना पोलीस तसेच अर्धसैनिक दलात नौकरीच्या संधी उपलब्ध होण्याकरीता पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असुन त्यापैकी पोलीस दलात ६७ व निमलष्करी दलात  १२ उमेदवारांची निवड झालेली आहे. जिल्हयातील नक्षल पिडीत व आत्मसमर्पीत नक्षल्यांच्या पाल्यांना नौकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याकरीता वेळोवेळी शासना सोबत पाठपुरावा केल्याने शासनाने नक्षल पिडीत पाल्यांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याबाबत परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. तसेच ५२ नक्षल पिडीतांना राज्य परिवहन विभागात विविध पदांवर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आदीवासी मुलां-मुर्लीच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील इतर ठिकाणी झालेली शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व औदयोगिक प्रगतीची माहिती होवुन त्याच्या मनातील नक्षलवादयांचा प्रभाव कमी करण्यासाठी  महाराष्ट्र सुवर्ण जयंती सहल योजना राबवुन १६३ मुलें व १५३ मुली यामध्ये १२ नक्षल पिडीत पाल्य व ७ नक्षलवादयांचे नातेवाईक असे एकुण ३१६ विदयार्थ्यांना  महाराष्ट्र दर्शन सहलीचा लाभ देण्यात आला.

आदिवासी युवकांच्या मनात खेळाविषयी आवड निर्माण करून त्यांना  राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ निर्माण करून देण्याचे उद्‌देशाने गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्यावतीने बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा व विर बाबुराव शेडमाके कबड्डी स्पर्धा आयोजित करून सदर स्पर्धेत विजेत्यांना रोख रक्कम, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे आदिवासींची संस्कृती जोपासण्यासाठी व समाजात मानाचे स्थान मिळवुन देण्यासाठी जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधुन 'आदिवासी विकास दौड' चे आयोजन करून स्पर्धेतील विजेत्यांना प्रोत्साहनपर रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देवुन सत्कार करण्यात आला. इतर सामाजिक परंपरे प्रमाणे आदिवासींचे विवाह करण्याचे उद्‌देशाने आदिवासी सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजन करून त्यात १०२ आदिवासी जोडप्यांचे विवाह करून देण्यात येवुन प्रत्येक जोडप्यास घरगुती साहित्य व कपडयांचे वाटप करण्यात आले.

सर्व सामान्य नागरिकांचे दृष्टीने सुध्दा गडचिरोली पोलीस दलाने वेळोवेळी प्रभावी कामगिरी केलेली आहे. गडचिरोली पोलीसांनी श्रमदानातुन रस्ते तयार करणे, पुल तयार करणे यासारखे हितोपयोगी कामे

त्याचप्रमाणे तरूणांना जगातील घडामोडीची माहिती होण्याचे दृष्टीने नक्षलग्रस्त भागात मनोरंजन हॉल तयार करून कोठी, भामरागड या सारख्या दुर्गम भागात सेटअप बॉक्स, टिव्ही लावुन देण्यात आली. विद्यार्थ्यांमधील ऐक्याची भावना वृद्धींगत करण्यासाठी सामाजिक सद्भावना परिक्षेचे आयोजन करण्यात आले. जिल्हयातील आदिवासी व सर्वसामान्य नागरीकांची हलाकीची परिस्थिती लक्षात घेता विविध पोलीस घटकांकडुन साहित्य प्राप्त करून दिवाळी निमित्य सदर कपडे, भांडी, स्टेशनरी साहित्य, दिवाळी फराळ व मिठाईचे वाटप करून पोलीसांनी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

PRAYAS (Police Reaching out to Youth and Student) हे उपक्रम हाती घेतले असुन त्याअंतर्गत शाळा आश्रामशाळांना भेटी देवुन तेथील सोयी सुविधा तपासुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करणे, कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत त्यांचेतील कला कौशल्याची माहिती घेवुन त्यांना हक्काचे व्यासपिठ मिळवुन देणे, विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेची तयार करण्याकरीता स्पर्धा परिक्षा केंद्र व करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणे त्यासोबतच शिक्षणांच्या सोयी सवलती उपलब्ध करून देण्याचे उद्देशाने यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापिठा अंतर्गत दुर्गम भागात विद्यापिठाचे केंद्र सुरू करण्यात आले. या मार्फत अर्धवट शिक्षण सोडाव्या लागलेल्या तसेच इतर अनेक कारणास्तव शिक्षणापासुन दुरावलेल्या युवकांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण होवुन याचा लाभ दुर्गम भागातील ६२३ विद्यार्थ्यांनी घेतला असुन पुढील शिक्षणासाठी त्यांना पोलीस दलामार्फत मुक्त विद्यापिठात प्रवेश देण्यात आला आहे. आश्रम शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास वाढविण्याकरीता विर बाबुराव शेडमाके सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच बरोबर आदिवासी महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळुन रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचे उद्देशाने हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्हयातील आदिवासी व ईतर नागरीकांचे प्रगती करीता काम करतांनाच गडचिरोली पोलीस दलाने गांधी विचार व अहिंसा पुस्ताकाचे वाचन करीत जगाला शांततेचा संदेश देत एक आगळा वेगळा विक्रम प्रस्थापित केला. त्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये घेण्यात आल्याने गडचिरोली पोलीसांचे नाव देशातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचले आहे.